UpLift
Enriching lives of the poor, together
अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा
मूल्य: रुपये २
# मनोगत
सप्टेंबर ५ - शिक्षक दिन
सप्टेंबर ८ - जागतिक साक्षरता दिन
सप्टेंबर - २६ बधीर दिन
सप्टेंबर २७ - जागतिक पर्यटन दिन
वर्ष: दोन
अंक २

## संपादकीय...

(काल्पनिक)

सालाबादप्रमाणे याही वर्षी येथील दारुवाला ट्रस्टने आयोजित केलेल्या गणपती देखावा स्पर्धेचा बक्षीस समारंभ पार पडला. या वर्षी 'आजारी गणेशोत्सव' हा विषय घेऊन येथील मंडळांनी आकर्षक देखावे सादर केले. बक्षीसे मिळालेल्या देखाव्यांची व मंडळांची थोडक्यात माहिती देत आहोत.

### आजारी गणेशोत्सव स्पर्धा - २००७ चा निकाल (सौजन्य दारुवाला ट्रस्ट)

<u>अचानक मित्र मंडळ</u>

मंडळाने लाऊडस्पिकरमुळे शरीरावर होणाऱ्या दुष्परिणामांवर आधारित देखावा सादर केला. गणपतीच्या दर्शनाला आलेला एक डॉक्टर गणपतीला वंदन करतो आणि दानपेटीत अंबाई श्रवणयंत्र टाकतो असा उपहासात्मक देखावा बालवृद्धांना आकर्षित करत होता.

<u>बादशहा तरूण मित्रमंडळ</u>

या मंडळाने गुटख्यांच्या पुड्यांचा भव्य गणपती बनविला. यासाठी १०, ००० पुड्यांचा वापर करण्यात आला होता.

<u>अखिल भारतीय पौराणिक सभा</u>

दरवर्षी नवनवीन पौराणिक देखावे सादर करण्याची परंपरा मंडळाने याही वर्षी कायम ठेवली. नारदमुनी यमाला बरोबर घेऊन भगवान ब्रह्म, विष्णू व शंकर यांच्या घरात घुसून, धमकावून, गणेशोत्सवासाठी वर्गणी गोळा करीत आहेत असा हलता देखावा सादर केला होता.

<u>अदृष्य मित्रमंडळ</u>

या मंडळाच्या गणपतीच्या दर्शनासाठी नेहमीप्रमाणे भाविकांची लांबच लांब रांग लागली होती. मंदिरात गणपतीची मूर्ती नसूनही काही पुण्यवान भक्तांना गणपती दर्शन देतो अशी लोकांची भावना आहे. रांगेतून बाहेर आलेल्या हजारो पुण्यवान भक्तांना यावेळी गणपती बाप्पाने दर्शन दिले असे म्हणण्यात येते.

<u>प्रचंड मित्रमंडळ</u>

भव्यदिव्य गणपतीची मूर्ती हे या मंडळाचे वैशिष्ट्य. याही वर्षी मंडळाने १०० फूट उंच 'चिंतातूर मुद्रेची' आकर्षक मूर्ती बनविली. मंडळाच्या प्रमुखांच्या म्हणण्यानुसार गणपती, समोर ठेवलेल्या रिकाम्या बादलीकडे बघत यामध्ये माझे विसर्जन कसे होणार? या चिंतेत असल्याचे सांगण्यात आले.

<u>धुल्ला गट मित्रमंडळ</u>

मंडळाने गणपतीच्या आरतीचे रिमिक्स लावले होते. आपल्या गणेशभक्तांच्या अतिउत्साहाला वैतागून गणपतीच आरती म्हणतो. आरतीचे एक कडवे येथे देत आहोत; (जयदेव जयदेव जयमंगलमूर्तीच्या चालीवर)

पुणेकर पुणेकर अतिउत्साहमूर्ती । तुमची भक्ती दिसते नाचगाण्यापुरती ।। गुलालबुक्क्याचा मारा दिनभर किती । रात्री बारानंतर स्पिकर बोलती ।। विसर्जनाचेदिवशी चरणे झिंगती । दोन दोन तीन तीन दिवस रस्ते थांबती ।। छोटे मोठे रंगीत पॅरिसचे गणपती । मुठेचे पोट खराब करती ।। पुणेकर पुणेकर अतिउत्साहमूर्ती । खालती येण्यापेक्षा बरा आहे मी वरती ।।

समारंभाच्या शेवटी ट्रस्टचे अध्यक्ष श्री. दारुवाला यांचे समारोप पर भाषण झाले. आजचा गणेशोत्सव विविध रोगांनी ग्रासलेला आहे हा संदेश या देखाव्यातून जनतेपर्यंत विशेषत: मंडळांच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचला असे ते म्हणाले. पुढील वर्षी 'सुदृढ गणपती उत्सव' असा विषय घेऊन मंडळांनी देखावे सादर करावेत असे आवाहन त्यांनी केले.

आपणा सर्वांना हा गणपती उत्सव आनंदाचा व सुखा समाधानाचा ठरो ही गणपतीचरणी प्रार्थना. गणपती बाप्पा मोरया

## पैशाचे पाय मोकळे ठेवा




केरबा : नमस्कार हरबा. कसा काय चाललाय धंदा तुझा?

हरबा : काय सांगू केरबा, या टायमाला राखीनं हात नाही दिला.

केरबा : म्हणजे?

हरबा : पाच हजाराचा माल पडून राहिला बघ. गणपतीच्या सणाचा धंदा लावायला पैसेच नाहीत आता.

केरबा : अरेरे..पण एवढ्या कशा राख्या शिल्लक राहिल्या?

हरबा : गेल्या वर्षी तीन-चार हजाराच्या राख्या विकल्या होत्या म्हणून या वर्षी दहा हजाराच्या भरल्या. पण गेल्याच नाहीत तेवढ्या.

केरबा : म्हणजे तू पैशाच्या पायाला बेड्या अडकवल्यास म्हण की! आता पुढच्या वर्षी राखी सिझनपर्यंत तुला माल बाहेर काढता येणार नाही.

हरबा : खरंय.

केरबा : माल किती विकला जाईल याचा अंदाज बांधणं फार महत्त्वाचं आहे बघ. कमी पण झाला नाही पाहिजे अन् जास्त पण व्हायला नाही पाहिजे.

हरबा : हो ना. माल कमी पडला तर धंदा बुडतो आणि जास्त झाला तर माल अडकून राहतो त्यामुळे पुढच्या धंद्याला पैसे कमी पडतात.

केरबा : तारेवरची कसरतच आहे बघ ही.

हरबा : पण आता पुढच्या धंद्याला भांडवल कुठून आणू. काय करायचं समजत नाहीए.

केरबा : समुद्र समोर असून पाणी प्यायला नाही अशी गत झालीय बघ तुझी. धंदा चांगला केला नाहीस म्हणून नाही तर मालाचं नीट नियोजन केलं नाही म्हणून असं झालं.

हरबा : खरंय तुझं.

केरबा : मालाचं नीट नियोजन ही पैशाच्या बेड्या सोडविण्याची किल्ली आहे. पैसा मोकळाच मग कमाईसाठी. खास करून सिझनल बिझनेस साठी तर मालाचं नियोजन खूप महत्त्वाचं आहे.

हरबा : खरंय गड्या. माल अटकला की पैसा अटकलाच.

केरबा : (खिशात हात घालत) हे घे दोन हजार रुपये हात उसने. तुझा नफा होताच परत कर. पण लक्षात ठेव..

हरबा : (मध्येच तोडत) पैसा बेडीत अडकवायचा नाही. बरोबर ना! आता बघ या गणपतीत पैसा नाही तर नफाच बेडीत अडकवतो.अन् किल्ली लावतो माझ्या कनवटीला.

केरबा : आता कसं बोललास. याला म्हणतात ठेच खावून शहाणं होणं. पण लक्षात ठेव, ठेच न खाताच शहाणं झालं पाहिजे. काय?

हरबा : होय गुरुदेव!

# आपले आरोग्य आपल्या हाती

## मानसिक आरोग्य - (भाग ३)

## पती-पत्नीमधील संवाद

(रात्रीचे ११ वाजलेत. दिवसभर रिक्षा चालवून थकलेला महेश घरी येतो. त्याची पत्नी आशा रागारागाने दरवाजा उघडते.)

आशा : ही काय वेळ झाली का यायची?

महेश : (खुर्चीवर बसत) पाणी दे आधी.

आशा : घ्या तुमचं तुम्हीच. वेळ नाही की काळ नाही. कधीही यायचं. रोजचंच झालंय तुमचं.

महेश : (रागाने) रोजचं झालंय म्हणजे काय? रिक्षा चालवायची म्हणजे काय स्वयपाक करण्यासारखं सोपंय का?

आशा : घर चालवण्यापेक्षा रिक्षा चालवणं सोपंय. सकाळपासून रात्रीपर्यंत स्वयपाक, पोरांचा अभ्यास, भाजी आणणं सगळं मीच करायचं. कधी एक दिवस लवकर येऊन आमची विचारपूस केलीय का?

महेश : तू तरी कधी थकून आलेल्या नवऱ्याची नीट विचारपूस केली आहेस का?

आशा : विचारपूस करायला तुम्ही घरात तर पाहिजे ना. रात्रीरात्रीपर्यंत चौकात काय गप्पा मारता हो मित्रांबरोबर? निरुद्योगी सगळे मित्र तुमचे.

महेश : आवाज एकदम खाली. माझ्या मित्रांना काही बोललीस तर बघ. चल जेवायला वाढ.

आशा : ताट ठेवलंय झाकून. घ्या तुमचं तुम्ही.

(तुमची वाट बघून बघून भूक मेली माझी. जेवतच नाही मी आता. असं काही तरी पुटपुटत आशा झोपायला निघून जाते.)

(दुसऱ्या दिवशीची सकाळ. आशा मुलाचा अभ्यास घेत आहे. एक वार्ताहर दार वाजवतो. महेश दार उघडतो.)

वार्ताहर : नमस्कार. महेश इथेच राहतात का?

महेश : हो. मीच महेश. तुमची ओळख?

वार्ताहर : मी वृत्तपत्राचा बातमीदार आहे. तुम्ही काल एका प्रवाशाची तुमच्या रिक्षात राहिलेली बॅग पोलिसांकडे सुपूर्त केली असं आम्ही ऐकलं.

महेश : होय खरंय ते.

(आशा आश्चर्यचकित नजरेने महेशकडे बघू लागते.)

वार्ताहर : काल काय घडलं ते सांगू शकाल तुम्ही.

महेश : रात्री साडेदहाची वेळ असेल. एक प्रवासी सिटी बँकेच्या समोर रिक्षात बसला. पुढे तो स्टेशनला उतरला. पुढच्या चौकात गेल्यावर माझ्या हे लक्षात आलं की त्याची बॅग रिक्षातच राहिली. मी ताबडतोब पोलिस चौकीत बॅग जमा केली.

वार्ताहर : पोलिसांच्या म्हणण्यानुसार त्या बॅगेत १ लाख रुपये होते.

महेश : बाप रे!

वार्ताहर : तुमच्यामुळे त्याचे पैसे सुरक्षित राहिले. आज त्याने तुम्हाला इनामही जाहीर केले आहे. मी ही बातमी देतोच आहे पेपरमध्ये. उद्याचा पेपर नक्की वाचा.

(वार्ताहर निघून जातो. महेश आशाकडे रागाने नजर टाकत रिक्षा चालू करतो.)




पाहिलंत मंडळी. आशानं जर महेशच्या उशीरा येण्यांच कारण विचारलं असतं तर? महेशनंही आशाला तू जेवलीस का असं विचारलं असतं तर? आशाही मनातल्या मनात पुटपुटण्यापेक्षा स्पष्ट बोलली असती तर? दोघांनीही एकमेकांच्या कामाचा अपमान केला नसता तर? असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात.

पती पत्नीमध्ये अशाच छोट्या छोट्या गोष्टींवरुन भांडणे सुरु होतात. कधी ती संपतात तर कधी त्याचं रुपांतर मोठ्या भांडणातही होतं. कधी कधी तर भांडण कशावरुन झालं हेच लक्षात रहात नाही आणि वेगळ्याच विषयावरुन भांडण सुरु होतं! एक मात्र नक्की की यामुळे घरातील वातावरण बिघडतं. लहान मुलांवर तसेच आपल्या आरोग्यावर देखील त्याचा वाईट परिणाम होतो. अशा भांडणांचं मूळ कारण म्हणजे विसंवाद. पती व पत्नी मध्ये सुसंवाद रहावा म्हणून खालील गोष्टींचा जरूर विचार करावा.

### संवाद कसा असावा :

१. संवाद करीत असताना समोरची व्यक्ती काय सांगत आहे हे लक्षपूर्वक ऐकावे. उदा. बऱ्याचवेळा आपण समोरची व्यक्ती काय बोलणार आहे हे गृहितच धरुन बोलतो.

२. समोरची व्यक्ती कोणत्या अवस्थेत आहे हे पहाणे आवश्यक आहे. उदा. महेश थकून आल्यामुळे भांडण वाढले.

३. नवऱ्याला अथवा बायकोला काय आवडते अथवा काय आवडत नाही याचा जरूर विचार करावा.

४. समोरच्या व्यक्तीच्या न आवडणाऱ्या गोष्टी तक्रारीच्या भाषेत न सांगता सौम्य शब्दात सांगाव्यात. उदा. आशाने महेशला ही काय वेळ झाली का यायची? असे विचारण्यापेक्षा आज उशीर का झाला? असे विचारले असते तर पुढचा वादच झाला नसता.

५. एकमेकांना दोष न देता आपल्याला काय हवंय ते स्पष्ट सांगावे.

६. एकमेकांच्या कामाचा, विचारांचा आदर करावा.

७. आपल्या रागाचे मूळ काय होते याचा शांतपणे विचार करावा.

८. रागाच्या भरात घाईघाईने कोणताही निर्णय न घेता पती-पत्नीने नंतर शांतपणे चर्चा करावी.


लेखन साहाय्य :
नेहा पाणेकर / दर्शना बनसोडे





संपर्क :१४ लँडमार्क अपार्टमेंट, बो. जे. रोड, साधू वास्वानी चौक, पुणे४११००१. फोन : ०९१ (२०) २६०५ १०१२ मेल : upliftindiaatul@gmail.com

# आपले सरकार

## पुणे महानगर पालिकेतर्फे वस्तीवासियांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कमवा व शिका योजना | या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना स्वबळावर शिक्षण पूर्ण करण्यास मदत होते. विविध प्रकारची कामे केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व शिक्षणाबाबत प्रेरणाही निर्माण होते तसेच व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासही मदत होते. | | | | | | | |
| | वैशिष्ट्ये | कोणासाठी | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न | कागदपत्रे | अर्ज मिळण्याचे व भरण्याचे ठिकाण | संपर्क |
| मुदत : १० सप्टेंबर २००७ | मा. महानगरपालिका आयुक्तांच्या सूचनांनुसार झोपडपट्टीत दररोज दोन तास शैक्षणिक, मनोरंजनात्मक तथा आरोग्यविषयक इ. बाबतीत काम करणे अपेक्षित असते. त्यासाठी दरमहा ५०० रुपयांचे मानधन मिळते. | सर्व जातीतील युवक युवतींसाठी | खुल्या वर्गासाठी १८ वर्षापर्यंत (बाकी सर्व वर्गासाठी वयाची अट नाही) | किमान ५० टक्के मिळवून दहावी उत्तीर्ण व महाविद्यालयीन शिक्षण चालू. (योजनेचा लाभ बहिस्थ विद्यार्थी घेऊ शकत नाहीत) | कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळविलेले मागील वर्षाचे उत्पन्न रु. ८०, ००० च्या आत. (अर्जदार झोपडपट्टीत राहत असल्यास शेजार समूह गटाचा उत्पन्नाच्या दाखल्याचा ठराव) | १. रेशनकार्डाची झेरॉक्स<br>२. शाळेचा बोनाफाईड<br>३. दहावीच्या मार्कलिस्टची झेरॉक्स<br>४. शेजार समूह गटाचा उत्पन्नाच्या दाखल्याचा ठराव<br>५. किमान एक फोटो.<br>६. मागासवर्गिय गटासाठी जातीचा दाखला | १.आपल्या वस्तीतील समूह संघटिका<br>२. एस्. एम्. जोशी सभागृह. दारूवाला पूल, पुणे. फोन :२६३३६२४९<br>३. दारिद्रय निर्मुलन कक्ष फोन : २५५०१२८४ | संबंधित सोशल वर्कर, एस्. एम्. जोशी सभागृह. दारूवाला पूल, पुणे. फोन : २६३३६२४९ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला सक्षमीकरण योजना क्रमांक ३ : | या योजनेअंतर्गत लाभ घेणारी व्यक्ती कुटुंबकर्त्याच्या मृत्यूनंतर मिळालेल्या अनुदानातून प्रशिक्षण घेऊन किंवा स्वयंरोजगार करून स्वत :च्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करू शकतील. | | | | | | | |
| अटी | वैशिष्ट्ये | कोणासाठी | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न | कागदपत्रे | अर्ज मिळण्याचे व भरण्याचे ठिकाण | संपर्क |
| अर्ज मृत व्यक्तीच्या मृत्यूपासून दोन वर्षाच्या आत भरणे बंधनकारक (१३.०२.२००७ नंतर मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबासाठी लागू) | रु.१०, ००० अनुदान | विधवा महिलांसाठी | मृत व्यक्तीचे वय १८ ते ६५ वर्ष असणे आवश्यक | नाही | कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळविलेले मागील वर्षाचे उत्पन्न रु.८०, ००० च्या आत.<br>(अर्जदार झोपडपट्टीत राहत असल्यास शेजार समूह गटाचा उत्पन्नाच्या दाखल्याचा ठराव) | १. रेशनकार्डाची झेरॉक्स<br>२. म.न.पा.चा मृत्यूचा दाखला<br>३. मृत व्यक्तीच्या वयाचा दाखला<br>४. अर्जदार झोपडपट्टीत राहत असल्यास शेजार समूह गटाचा उत्पन्नाच्या दाखल्याचा ठराव<br>५. मृत व्यक्ती कुटुंबप्रमुख असल्याचा दाखला (शेजारसमूह गटाचा अथवा गावठाणासाठी तहसीलदाराचा दाखला)<br>६.किमान एक फोटो. | १.आपल्या वस्तीतील समूह संघटिका<br>२. एस्. एम्. जोशी सभागृह. दारूवाला पूल, पुणे. फोन :२६३३६२४९<br>३. दारिद्रय निर्मुलन कक्ष फोन : २५५०१२८४ | संबंधित सोशल वर्कर, एस्. एम्. जोशी सभागृह. दारूवाला पूल, पुणे. फोन : २६३३६२४९ |

लेखन साहाय्य :

क्रमशः

# हातची संधी

## आपण खालील क्षेत्रात काम करण्यासाठी नोकरी शोधत आहात का?

घरकाम, स्वयंपाक, ऑफिस असिस्टंट, सेल्समन, वॉर्डबॉय, रुग्णसेवा इत्यादी.

## मग पुण्यातील विविध भागात उपलब्ध असलेल्या नोकरीची संधी चुकवू नका!

ताबडतोब संपर्क करा -

अन्नपूर्णा परिवारातील सदस्यांसाठी संपर्कः
सौ. अनितातार्ई सोनावणे
फोनः २५४४७७९१
मोबाईलः ९८६०८७३८०६

पर्वती स्वयंरोजगार संस्थेच्या सदस्यांसाठी संपर्कः
श्री. संदीप भिलारे
मोबाईलः ९३२५६४१३८७



संपर्क :१४ लँडमार्क अपार्टमेंट, बी. जे. रोड, साधू वास्वानी चौक, पुणे४११००१ | फोन : ०९१ (२०) २६०५ १०१३ | ईमेल : upliftindiaatul@gmail.com